# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २४/०९/२०२४ (मंगळवार) दुपार**

---

### काटोल हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. २४/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे काटोल हद्दीतील पेठबुधवार परिसरात मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांना मिळाल्याने पोस्टे काटोल हद्दीतील पेठबुधवार परिसरात सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या एकूण ०२ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे ०१ महिला आरोपी व **फरार आरोपी नामे– गणेश हागोने रा. पेठबुधवार काटोल** यांचे ताब्यातून एकुण १) प्लॅस्टिक डबकित एकूण ६६ लिटर मोहाफुल गावठी दारू एकूण किंमती ३३००/–रू. २) २०० लिटर मोहफुल सडवा रसायन एकूण किंमती ४०००/–रू. व इतर दारू गाळण्याचे साहित्य किंमती ३०००/–रू. असा एकुण १०३००/–रू. चा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. ०२ आरोपीतांविरूद्ध कलम ६५(ई), (एफ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी मनोज गदादे, सपोनी आशिष ठाकूर, पोहवा ईकबाल शेख, पोहवा राजू रेवतकर, मपोहवा कविता बछले, पोशी धोंडुतात्या देवकते, चालक पोशी आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे यांनी पार पाडली.

### प्राणांतिक अपघात

पोस्टे मौदा अंतर्गत दिवांनका एनर्जी कंपनी जवळ हायवे क्र. एन एच ५३ येथे दिनांक २२/०९/२०२४ चे १८.०० वा. ते २३/९/२०२४ चे ०९/०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे– पंकज बडवंत मांडेकर वय ४९ वर्ष रा. विवेकानंद कॉलनी जवाहर नगर भंडारा** हा संध्याकाळी ०६.०० वा. डयुटीकामी कंपनीत आला डयुटी ०७.०० वा. सुरू होणार असल्याने त्याने आपले बॅग व गाडी कंपनीतच ठेवुन पायदळ कंपनीच्या बाहेर रोड कडे निघाला असता फिर्यादी नामे– श्रीकांत विष्णु चोपकर वय ३४ वर्ष रा. मानेगाव बाजार ता. जि. भंडारा याला दिसला. मृतक रोडने जात असता अज्ञात पांढऱ्या रंगाच्या टी व्ही एस अपाची दुचाकी वाहन चालकाने धडक दिल्याने मृतक जख्मी अवस्थेत रोडवर पडला. दिनांक २३/९/२०२४ रोजी उपचारा दरम्यान मृतक पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं. सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपी चालकाचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर